# समाज कल्याण विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजना

१) स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना सहाय्यक अनुदाने.

२) केंद्र पुरस्कृत / राज्य पुरस्कृत योजनेअंतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहाना विस्तारित इमारत बांधकामासाठी अनुदाने.

३) मागासवर्गीय मुला-मुलींकरिता शासकीय वसतिगृहे.

४) मागासवर्गीय तथा आर्थिक दृष्टया मागासवर्गीय मुलींकरिता शासकीय वसतिगृहे.

५) ग्रामिण भागातील मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छप्परे बदलून मंगलोरी कौले टीनपत्रे पुरविणे.

६) आंतरजातीय विवाहित दाम्पत्यांना प्रोत्साहनपर अनुदान देणे.

७) दलित वस्ती सुधारणा

८) मागासवर्गीय सहकारी गृह निर्माण योजना (ग्रामिण)

९) अपंग व्यक्तिंना कृत्रिम अवयव / तिनचाकी सायकली / श्रवणयंत्रे / टेपरेकॉर्डर पुरविणे.

१०) प्रशिक्षण अपंगाना व्यवसाय करीता वित्तीय सहाय्य.

११) अपंगांना ओळखपत्र देणे.

१२) महाराष्ट्र अपंग शिष्यवृत्ती

१३) भारत सरकार अपंग शिष्यवृत्ती

१४) अपंग बीज भांडवल स्वयंरोजगार योजना

१५) अपंग राज्य/राष्ट्रीय पुरस्कार योजना

१६) केंद्रिय अनुदान योजना

१७) वृध्दाश्रम योजना

१८) माध्यमिक शाळेत शिकणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

१९) इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणा-या मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती

२०) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना विद्यावेतन प्रदान करणे.

२१) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी घ्यावयाच्या विविध योजना.

१) स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना सहाय्यक अनुदाने.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | इयत्ता ५ वी ते १० वी मधील मागास/इतर मागास समाजातील मुला मुलींना वसतिगृहात प्रवेश देऊन त्यांचे भोजन व निवासाची मोफत सोय केली जाते. |
| पात्रतेच्या अटी : | १. विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. २४०००/- चे आत असावे.<br>२.विद्यार्थी स्थानिक नसावा.<br>३. विद्यार्थी सलग दोन वेळा नापास झालेला नसावा. |
| संपर्क अधिकारी : | स्वयंसेवी संस्थामार्फत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद, अहमदनगर |

TOP

## २) केंद्र पुरस्कृत / राज्य पुरस्कृत योजनेअंतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहाना विस्तारित इमारत बांधकामासाठी अनुदाने.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | बांधकाम विभागाने जे दर प्रमाणित केले आहेत त्या बांधकामाचे आराखडे व अंदाजपत्रकानुसार जी रक्कम येईल त्या रकमेच्या ४५ टक्के केंद्रशासन व ४५ टक्के राज्य शासन अनुदान देईल व १० टक्के संस्थेचा हिस्सा राहील. |
| पात्रतेच्या अटी : | १.स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणारे वसतिगृह शासन मान्य असावे.<br>२.संस्थेची स्वत:ची जागा असावी<br>३.संस्थेला स्वत:चा हिस्सा म्हणून योजनेच्या एकुण मान्य अंदाजपत्रकाच्या किंमतीची १० टक्के रक्कम स्वत: खर्च करावी लागेल. |
| संपर्क अधिकारी : | स्वयंसेवी संस्थेमार्फत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट-अ जिल्हा परिषद, अहमदनगर |

TOP

## ३) मागासवर्गीय मुला-मुलींकरिता शासकीय वसतिगृहे.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | इयत्ता ८ वी पासून शालेय व महाविद्यालयीन उच्चमहाविद्यालयीन शिक्षणाकरिता संबंधित वसतिगृहातून गुणवत्तेच्या निकषावर प्रवेश देण्यात येतो. प्रवेशित विद्यार्थी विद्यार्थिनींना मोफत भोजन, वहया पुस्तके, शाळा-महाविद्यालयांनी शिफारस केल्याप्रमाणे आवश्यक स्टेशनरी इ. सर्व साहित्य शासनामार्फत पुरविले जाते. बसपास व कटींग या खर्चासाठी प्रत्येक विद्यार्थ्यास दरमहा रु. २५/- निर्वाहभत्ता दिला जातो. शालेय विद्यार्थ्यांना वर्षातून दोन गणवेशाचे संच पुरविले जातात. |
| पात्रतेच्या अटी : | ज्या विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ६०,०००/- पेक्षा कमी आहे अशा पालकांचे अनु.जाती, अनु.जमाती, वि.जा.भ.ज., आर्थिक दृष्टया मागासवर्गीय अपंग व अनाथ विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या अटीवर अशा वसतिगृहातून प्रवेश दिला जातो. |
| संपर्क अधिकरी : | संबंधित वसतिगृहाचे गृहपाल व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेशी संपर्क साधावा. |

TOP

## ४) मागासवर्गीय तथा आर्थिक दृष्टया मागासवर्गीय मुलींकरिता शासकीय वसतिगृहे.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | इयत्ता ८ वी पासून शालेय व महाविद्यालयीन उच्चमहाविद्यालयीन शिक्षणाकरिता संबंधित वसतिगृहातून गुणवत्तेच्या निकषावर प्रवेश देण्यात येतो. प्रवेशित विद्यार्थी विद्यार्थिनींना मोफत भोजन, वहया पुस्तके, शाळा-महाविद्यालयांनी शिफारस केल्याप्रमाणे आवश्यक स्टेशनरी इ. सर्व साहित्य शासनामार्फत पुरविले जाते. बसपास व कटींग या खर्चासाठी प्रत्येक विद्यार्थ्यास दरमहा रु. २५/- निर्वाहभत्ता दिला जातो. शालेय विद्यार्थ्यांना वर्षातून दोन गणवेशाचे संच पुरविले जातात. |
| पात्रतेच्या अटी : | ज्या विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ६०,०००/- पेक्षा कमी आहे अशा पालकांचे अनु.जाती, अनु.जमाती, वि.जा.भ.ज., आर्थिक दृष्टया मागासवर्गीय अपंग व अनाथ विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या अटीवर अशा वसतिगृहातून प्रवेश दिला जातो. |
| संपर्क अधिकरी : | संबंधित वसतिगृहाचे गृहपाल व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेशी संपर्क साधावा. |

TOP

५) ग्रामिण भागातील मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छप्परे बदलून मंगलोरी कौले टीनपत्रे पुरविणे.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | वस्तुरुपाने टीनपत्रे व रोख स्वरुपात १,५००/- रु. रोख अनुदान. |
| पात्रतेच्या अटी : | अर्जदार ग्रामिण भागातील मागासवर्गीय असावा. वार्षिक उत्पन्न रु. २०,०००/- चे आत असावे. स्वत:च्या मालकीचे घर व त्यावर गवती छप्पर असावे. |
| संपर्क अधिकारी : | गट विकास अधिकारी, पंचायत समिती व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट जिल्हा परिषद, अहमदनगर . |

TOP

६) आंतरजातीय विवाहित दाम्पत्यांना प्रोत्साहनपर अनुदान देणे.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | प्रत्येक जोडप्यास रु. १५,०००/- अनुदान स्वरुपात देण्यात येते त्यापैकी रु. ७०००/- रोख, रु. ४००/- संसार उपयोगी भांडी व रु. ७,५००/- ची बचत प्रमाणपत्रे देण्यात येतात. या जोडप्यांच्या सत्कार संमारंभावर रु. १००/- खर्च करण्यात येतो. |
| पात्रतेच्या अटी : | लग्न झालेल्या जोडप्यांपैकी एक व्यक्ति सवर्ण हिंदू व दूसरी व्यक्ति मागासवर्गीय असली पाहिजे. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जि.प. अ.नगर |

TOP

७) दलित वस्ती सुधारणा

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | अनु.जातीच्या वस्त्यामधून अनेक मुलभूत सुखसोयीचा अभाव असतो. त्यामुळे त्यांना असंख्य अडीअडचणींना व गैरसोयींना तोंड द्यावे लागते. अशाा वस्त्यामधून रस्ते, गटार, शौचालये, पाणीपुरवठा, विद्युतीकरण, समाज मंदिरे, स्मशानभूमी, संरक्षण भिंत इ. व्यवस्था करुन वस्त्यांची स्थिती सुधारणे. प्रत्येक वस्तीकरिता खालील प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात येते.<br>1. अनुसूचित जातीची लोकसंख्या १५० च्यापुढे असल्यास त्या गांवाना रु. ५.०० लाख अनुदान मंजूर केले जाते.<br>2. अनु.जातीची लोकसंख्या १०० ते १५० च्या पुढे आहे अशा गांवाना रु. ३.०० लाख अनुदान मंजूर केले जाते.<br>3. अनु.जातीची लोकसंख्या ५० ते १०० पर्यत आहे अशा गावांना रु.२.०० लाख अनुदान मंजूर केले जाते. |
| पात्रतेच्या अटी : | १. एकुण लोकसंख्या व अनु.जातीची लोकसंख्या<br>2. अनु.जातीची लोकसंख्या कमीतकमी ५० व १५० च्या पुढे असावी.<br>3. मंजूर बांधकाम मुदतीत पुर्ण करणे बाबत ठराव व ग्रामपंचायतीचा नांवे असलेला ७/१२ चा उतारा अथवा प्रमाणपत्र ग्रामसभेचा मासिक ठराव<br>4. बांधकामाच्या जागेचा नकाशा उपअभियंता यांच्या सहि व शिक्क्याचा<br>5. उपअभियंता यांनी मंजूर केलेला अंदाजित खर्चाचा आराखडा<br>6. मागासवर्गीय वस्तीतील लोकांचा कामकाज होणे बाबतचा अर्ज. |
| संपर्क अधिकारी : | गट विकास अधिकारी, पंचायत समिती व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट जिल्हा परिषद, अहमदनगर |

TOP

८) मागासवर्गीय सहकारी गृह निर्माण योजना (ग्रामिण)

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | मागासवर्गीयांना निवारा उपलब्ध व्हावा व पक्या घरात राहता यावे म्हणून सदरची योजना सुरु करणेत आली आहे. |
| पात्रतेच्या अटी : | १. मागासवर्गीय लोकांनी एकत्र येवून गृहनिर्माण संस्था स्थापन करुन सहकारी विभागाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. अशा नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेतील अनुसूचित जातीच्या सभासदांना सदर योजनेसाठी अनुदान कर्जावरील व्याज अनुदान दिले जाते. त्यासाठी उत्पन्नाची मर्यादा ही वार्षिक ५०००/- च्या आत असावी. मागासेतर १० टक्के सभासद घेता येतात. त्यासाठी उत्पन्न मर्यादा रु. २५०००/- च्या आत असावे.<br>2. नोंदणीकृत गृहनिर्माण सभासदांना खालील बांधकाम खर्चाची मर्यादा रु. ८००००/- पर्यत असून त्याच्या ३० टक्के अनुदान, २० टक्के स्वहिस्सा व ५० टक्के प्रमाणे कोणत्याही शेडयुल्ड बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या १० टक्के प्रमाणे व्याज दिले जाते.<br>३. नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेस शासकीय जमीन उपलब्ध असल्यास जिल्हाधिकारी यांचे कडून विनामुल्य दिले जाते. संस्थेने खाजगी जमिन घेतली असल्यास सदरहू नगर रचना विभाग ठरवतील ती किंमत संस्थेला अर्थसहाय्य म्हणून दिले जाते. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, अ.नगर |

TOP

९) अपंग व्यक्तिंना कृत्रिम अवयव / तिनचाकी सायकली / श्रवणयंत्रे / टेपरेकॉर्डर पुरविणे.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | 1. कमरे पासून पोलिओ झालेल्या दोन्ही पायाने अपंग व्यक्तिस तीन चाकी सायकल दिली जाते<br>2. कर्णबधीर व्यक्तीस श्रवणयंत्र पुरविण्यात येते<br>3. एस.एस.सी. नंतर शिक्षण घेणा-या पुर्ण अंध विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्डर पुरविण्यात येते.<br>4. अपंग व्यक्तिस कृत्रिम अवयव बसवून दिले जातात. |
| पात्रतेच्या अटी : | 1. जिल्हाशल्य चिकित्सक अधिका-यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र<br>2. वार्षिक उत्पन्न रु.१८०००/- पेक्षा कमी असल्यास १०० टक्के अनुदान दिले जाते.<br>3. रहिवाशी दाखला फोटो<br>4. व्यवसाय किंवा रोजगार उद्योग धंदा करणारा व्यक्ति असावा.<br>5. वयाचा अथवा जन्माचा दाखला. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी गट अ जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

१०) प्रशिक्षण अपंगाना व्यवसाय करीता वित्तीय सहाय्य.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | रु. १०००/- पर्यत साहित्याचे रुपाने धंदा/व्यवसायाकरीता आर्थिक मदत देण्यात येते. |
| पात्रतेच्या अटी : | 1. जिल्हा शल्य चिकित्सक अधिका-याचे अपंगत्वाचे ४० टक्के प्रमाणपत्र<br>2. वार्षिक उत्पन्नाचा दाखला<br>3. रहिवाशीचा दाखला<br>4. वयाचा दाखला<br>5. फोटो<br>6. प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र<br>7. साहित्याची यादी |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी गट अ जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

११) अपंगांना ओळखपत्र देणे.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | अपंगांना त्याचेसाठी असलेल्या सर्वसाधारण सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी अपंगांना ओळखपत्र दिले जाते. |
| पात्रतेच्या अटी : | १.जिल्हा शल्यचिकित्सक यांचा अपंगत्वाचा दाखला<br>२.वयाचा दाखला<br>३.रहिवाशी दाखला<br>४. दोन पासपोर्ट आकाराचे फोटो |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी गट अ जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

१२) महाराष्ट्र अपंग शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | इयत्ता १ ली ते ८ वी पर्यत अपंग विद्यार्थ्यांना अपंग शिष्यवृत्ती शाळे मार्फत अदा करण्यात येईल. इयत्ता १ ली ते ४ वी रु.३०/- इयत्ता ५ वी ते ७ वी रु.४०/- दरमहा. इयत्ता ८ वी करीता रु.५०/- दराने अदा करण्यात येते. |
| पात्रतेच्या अटी : | 1. जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र अपंगत्व ४० टक्के पेक्षा जास्त असावे.<br>2. अंध विद्यार्थी दोन्ही डोळयांनी १०० टक्के अंध असावा किंवा ६/६०,६/६० दोन्ही डोळयांनी अंधत्व असावे .<br>3. गुणपत्रिका<br>4. वार्षिक उत्पन्न रु.२४०००/- चे आत असावे. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी गट अ जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

१३) भारत सरकार अपंग शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | इयत्ता ९ वी च्या पुढील शिक्षण घेणा-या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात येते.<br>1. इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यत रु.८५/- दरमहा.<br>2. पदवी पर्यतचे शिक्षण रु. १२५/- दरमहा.<br>3. पदवीत्तर शिक्षण घेणा-या रु.१७०/- दरमहा तसेच मेडीकल, इंजिनिअरींगचे शिक्षण घेणारे विद्यार्थी<br>4. आय.टी.आय. डी.एड. रु.१२५/- दरमहा प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी. |
| पात्रतेच्या अटी : | 1. जिल्हा शल्य चिकित्सकाचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र ४० टक्के पेक्षा जास्त असावे.<br>2. अंध विद्यार्थी दोन्ही डोळयांनी १०० टक्के अंध असावा किंवा ६/६०,६/६० दोन्ही डोळयांनी अंधत्व असावे<br>3. वार्षिक उत्पन्न रु. २४०००/- पर्यत असावे. उत्पन्नाचा दाखला नायब तहसिलदार पेक्षा कमी दर्जाच्या अधिका-याचा नसावा.<br>4. विद्यार्थी ४० टक्के गुणाने उत्तीर्ण असावा. अे.टी.के.टी. असणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात येवू नये. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी गट अ जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

१४) अपंग बीज भांडवल स्वयंरोजगार योजना

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | बेरोजगार अपंग व्यक्तिंना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत रु. २५०००/-पर्यत कर्ज मर्यादा आहे. त्यावर २० टक्के अनुदानातून रु. ५०००/- पर्यत लाभ देण्यात येतो- |
| पात्रतेच्या अटी : | 1. वार्षिक उत्पन्न रु. ६०००/- पर्यत असावे<br>2. जिल्हा शल्य चिकित्सकाचे प्रमाणपत्र ४० टक्के पेक्षा जास्त नसावे<br>3. वयाचा दाखला/जन्माचा दाखला<br>4. रहिवाशीचा दाखला (ग्रामपंचायत)<br>5. बेरोजगार असल्याचे प्रमाणपत्र<br>6. वय १८ ते ५० वर्षापर्यत असावे. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

१५) अपंग राज्य/राष्ट्रीय पुरस्कार योजना

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | 1. प्रशस्तीपत्रक<br>2. रोख रु.३०००/- पर्यत बक्षीस देण्यात येते. |
| पात्रतेच्या अटी : | अपंग कल्याणासाठी कार्य करणारी व्यक्ती, संस्था, वैयक्तिक, अपंगास गुणात्मक कार्य करण्यासाठी पुरस्कार वितरण केले जाते. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

१६) केंद्रिय अनुदान योजना

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | केंद्र सरकारकडून अपंग संस्था, वृध्दाश्रम करीता अनुदाने देण्यात येते. |
| पात्रतेच्या अटी : | 1. विहित नमुन्यातील अर्ज (४ प्रतीत)<br>2. संस्था नोंदणी प्रमाणपत्र<br>3. लेखा विवरणपत्र<br>4. लाभार्थीची यादी, अपंगत्वाचे प्रमाणपत्र<br>५. संस्थेचा प्रगती अहवाल, ठराव इ. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

१७) वृध्दाश्रम योजना

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | वयाची ६० वर्षे पुर्ण झालेले वृध्द निराधार पुरुष व ५५ वर्षे पुर्ण वयाच्या निराधार स्त्रीया तसेच त्यापेक्षा कमी वयाच्या निराधार अपंग पिडीतांना भोजन,निवास,आसरा,वैद्यकीय उपचार इ. सोयी उपलब्ध करुन देणेसाठी स्वंयसेवी संस्था मार्फत चालविल्या जाणा-या वृध्दाश्रमांना दरडोई रु. ३३५/- या प्रमाणे शासनाकडून अनुदान दिले जाते. |
| पात्रतेच्या अटी : | वयाची ६० वर्षे पुर्ण झालेले वृध्द निराधार पुरुष व ५५ वर्षे पुर्ण वयाच्या निराधार स्त्रीया भोजन,निवास,आसरा,वैद्यकीय उपचार इ. सोयी उपलब्ध करुन देणेसाठी स्वंयसेवी संस्था मार्फत चालविल्या जाणा-या वृध्दाश्रमांना दरडोई रु. ३३५/- प्रमाणे शासनाकडून अनुदान दिले जाते. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

१८) माध्यमिक शाळेत शिकणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | अ.इयत्ता ५ वी ते ७ वी रु. २०/- दरमहा (१० महिन्याकरीता)<br><br>इयत्ता ८ वी ते ९ वी रु. ४०/- दरमहा (१० महिन्याकरीता) इयत्ता १० वी<br><br>ब) इयत्ता ५ वी ते ७ वी रु. ६०/- दरमहा (१० महिन्याकरीता) |
| पात्रतेच्या अटी : | अ.वार्षिक परिक्षेमध्ये कमीतकमी ५० टक्के गुण मिळाले आहेत. व वर्षामध्ये प्रथम द्वितीय क्रमांकांने उत्तीर्ण झालेला असावा. ब.इयत्ता ५ वी ते ७ वी सर्व मागासवर्गीय मुलींना अनुज्ञेय. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

१९) इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणा-या मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | अ.इयत्ता ५ वी ते ७ वी रु. २०/- दरमहा (१० महिन्याकरीता)<br>इयत्ता ८ वी ते ९ वी रु. ४०/- दरमहा (१० महिन्याकरीता) इयत्ता १० वी<br>ब) इयत्ता ५ वी ते ७ वी रु. ६०/- दरमहा (१० महिन्याकरीता) |
| पात्रतेच्या अटी : | अ.वार्षिक परिक्षेमध्ये कमीतकमी ५० टक्के गुण मिळाले आहेत. व वर्षामध्ये प्रथम द्वितीय क्रमांकांने उत्तीर्ण झालेला असावा. ब.इयत्ता ५ वी ते ७ वी सर्व मागासवर्गीय मुलींना अनुज्ञेय. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

२०) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना विद्यावेतन प्रदान करणे.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | मागासवर्गीय अनु.जातीच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाकडे वळविण्याकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन दिले जाते. हे प्राचार्य मार्फत अदा केले जाते. |
| पात्रतेच्या अटी : | 1. हि योजना मागासवर्गीय अनुजातीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे.<br>2. विद्यार्थी मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकणारा असावा. |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी घ्यावयाच्या विविध योजना.

| | |
|---|---|
| फायदयाचे स्वरुप : | जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या सामुहिक व वैयक्तिक लाभाच्या खालील योजना घेण्यात येतात.<br><br>१.मागासवर्गीयासाठी बालवाडया<br><br>२.मागासवर्गीयांना नविन घरे बांधण्यासाठी अगर दुरुस्तीसाठी अर्थ सहाय्य.<br><br>३.मागासवर्गीयांना वसतिगृह, अभ्यासिका तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना/विद्यार्थीनींना गणवेश पुरविणे.<br><br>४.आंतरजातीय विवाहित जोडप्यांना पुरक अर्थसहाय्य<br><br>५.मागासवर्गीयांना लघु उद्योगासाठी अर्थ सहाय्य उदा.प्रशिक्षित मागासवर्गीयांना शिलाई मशिन पुरविणे, लेथ, ऑईल इंजिन, इले. मोटार खरेदीसाठी अर्थ सहाय्य इ.<br><br>६.मागासवर्गीयांसाठी पाणीपुरवठयाची सोय, विहीर दुरुस्ती इ.<br><br>७.मागासवर्गीय अनु.जाती वर्गातील मुलांच्या शैक्षणिक सहली.<br><br>८.मागासवर्गीयांना बायोगॅस प्लँटसाठी अर्थसहाय्य<br><br>९.मागासवर्गीय वस्तीत जोड रस्ते, रस्त्यावरील दिवा बत्ती सुविधा पुरविणे<br><br>१०.मागासवर्गीय वस्तीमध्ये उद्याने, बगीचे, समाज मंदीरे, प्रौढ शिक्षण व्यवस्था, क्रिडांगण, ग्रंथालय इ. सुविधा पुरविणे<br><br>११.प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये मागासवर्गीय हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी पुस्तके, लेखन साहित्य, गणवेश पुरविणे<br><br>१२.मागासवर्गीयांसाठी कमी खर्चाचे संडास<br><br>१३.मागासवर्गीयांना घरगुती वापरासाठी विद्यूत पुरवठा करणे<br><br>१४.मागासवर्गीय कुष्ठरोग्यांना पुनर्वसनासाठी अर्थ सहाय्य<br><br>१५.मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वासंतिक वर्ग चालू करणे<br><br>१६.समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणा-या हरिजन वस्त्यांची सुधारणा या योजनांतर्गत बांधलेल्या समाज मंदीराचे अपुर्ण काम पुर्ण करण्यास आर्थिक सहाय्य<br><br>१७.व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांना मिळत असलेली शिष्यवृत्ती अपुरी पडत असल्यास अर्थसहाय्य<br><br>१८.मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी वसतिगृहे<br><br>१९.मागासवर्गीय लोकांना २० टक्के उत्पन्नातून बायोगॅस साठी शेगडी, कॉक व पाईप इ. साहित्यांचा पुरवठा करणे<br><br>२०.जिवनधारा/जवाहर रोजगार योजनांतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यांचे विहिरीवर विजेचे |

| | |
|---|---|
| | पोल पुरविण्यासाठी अर्थसहाय्य देणे<br><br>२१.मागासवर्गीय एस.एस.सी. अनुउत्तीर्ण विद्यार्थ्यांना स्वंयरोजगाराला संधी उपलब्ध करुन देणेसाठी वाहन चालकाचे प्रशिक्षण देणे<br><br>२२.गवती छपरे बदलून छपरावर टिन पत्रे घालणे<br><br>२३.मागासवर्गीय शेतक-यांना शेतीची अवजारे व चाके जोडी पुरविणे<br><br>२४.बेघर भुमीहिन घरकुल योजनेखाली बांधलेल्या घरांना नागरी सुविधा पुरविणे<br><br>२५.सिंचन योजना (एकुण निधीच्या २५ टक्के खर्च जादा होणार नाही या अटीवर) |
| पात्रतेच्या अटी : | १.कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असेलतर त्यांना लाभ देण्यात येवू नये.<br><br>२.दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यास प्राधान्य देण्यात यावे.<br><br>३.सन १९९८-९९ या दारिद्रय रेषेखालील सर्वेक्षणात ज्या लाभार्थींची नांवे समाविष्ट आहेत अशा लाभार्थ्यासाठी जातीचे व उत्पन्नाचे दाखले आवश्यक रहाणार नाहीत. कारण जात व उत्पन्नाचे नोंद दारिद्रय रेषेच्या प्रमाणपत्रामध्ये असते.<br><br>४.ज्या लाभार्थ्यांची नांवे सन १९९८-९९ च्या दारिद्रय रेषेखाली सर्वेक्षणात समाविष्ट नाहीत अशा लाभार्थ्यासाठी जातीचा दाखला तहसिलदार किंवा उपविभागीय अधिकारी यांचा व उत्पन्नाचा दाखला तहसिलदार यांचा असावा.<br><br>५.उत्पन्नाची मर्यादा : ज्या लाभार्थ्याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.२०,०००/- (वीस हजार फक्त) पर्यत आहे अशा लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा.<br><br>६.लाभार्थी निवड ग्रामसभेत करण्यात यावी व प्रकरणासोबत ग्रामसभेच्या ठरावाची प्रत जोडणे आवश्यक आहे. याशिवाय जिल्हा परिषदेने हाती घेतलेल्या योजनांच्या स्वरुपानुसार इतर आवश्यक कागदपत्रे |
| संपर्क अधिकारी : | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद अहमदनगर |

TOP